# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर,सदर,नागपूर

दुरध्वनी क्रमांक : २५६५१४३
E-mail:ronagpur.dte@gmail.com

फॅक्स क्रमांक : ०७१२-२५६१६६३
Website:www.rdtenagpur.org.in

तात्काळ

क्रमांक:तंशिसं/विकाना/का-३/आस्था/म.त.नि.स./२०१२/2577
दिनांक: 28 AUG 2012

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/ अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित
अभियांत्रिकी महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्था

**विषय :- कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध करण्याकरता महिला तक्रार निवारण समित्यांचे योग्य प्रकारे गठण करणेबाबत...**

संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र क्र.तंशिसं/विकाना/आस्था/२०१२/२२७२, दि.३१/०७/२०१२
२) या कार्यालयाचे पत्र क्र.तंशिसं/विकाना/आस्था/२०१२/२३८३, दि.०८/०८/२०१२
३) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१६/आस्था/म.त.नि.स./ शा२५१८३, दि.२४/०८/२०१२

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये महिला तक्रार निवारण समितीचे योग्य प्रकारे गठन करण्याबाबत उपरोक्त संदर्भ क्र.१ पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. तथापि बऱ्याचशा संस्थांमध्ये अद्यापही अशाप्रकारे गठीत करण्यात आलेल्या समित्यांच्या प्रति या कार्यालयांस प्राप्त झालेल्या नाहीत. तसेच ज्या संस्थांनी समिती गठित करुन त्यांची प्रत या कार्यालयांस सादर केलेली आहे. त्यांनी योग्यप्रकारे समिती गठित केल्याचे दिसुन येत नाही. करीता संदर्भ क्र. ३ न्वये या कार्यालयांस प्राप्त झालेले शासनपत्र व बाल विकास विभागाचे दिनांक ११/०६/२०१० व दिनांक ०४/१०/२०१० चे परिपत्रक **या कार्यालयाचे www.rdtenagpur.org.in या संकेतस्थळावर Download सेक्शनमध्ये आपणांस उपलब्ध करुन देण्यात येत आहे.**

तरी आपणांस कळविण्यांत येते की, सदर शासनपत्र व बाल विकास विभागाचे शासन परिपत्रके यांचा योग्यप्रकारे अवलोकन करुन त्यात दिलेल्या सुचनेप्रमाणे **आपल्या संस्थेमध्ये महिला तक्रार निवारण समिती स्थापन करुन त्याबाबतच्या आदेशांची प्रत तसेच योग्यप्रकारे महिला तक्रार निवारण समिती स्थापन झाल्याबाबतचे प्रमाणपत्र फॅक्स / मेलव्दारे तात्काळ या कार्यालयांस सादर करावे.**

तसेच विवरणपत्र १ व २ प्रत्येक महिन्याची माहिती या कार्यालयांस सादर करण्याबाबत संदर्भ क्र. २ अन्वये यापूर्वीच आपणांस कळविण्यात आलेले आहे. तरी **सदरहू माहिती विवरणपत्र १ व २ मध्ये प्रत्येक महिन्याच्या ३ तारखेच्या आंत फॅक्स / मेल व्दारे या कार्यालयांस सादर करण्यात यावी.**

सहपत्र : वरीलप्रमाणे

(सुधीर कृ.दाभाडे) २८/८/१२
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर

प्रत : प्रोग्रामर, हेच कार्यालय यांना आवश्यक कार्यवाहीकरीता. त्यांनी उपरोक्त पत्राची संपूर्ण प्रत या कार्यालयाचे वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २६२०६०९, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.
तार — EDUTECH E-mail : desk16@dte.org.in Internet :http/www.dte.org

क्रमांक : १६/आस्था/म.त.नि.स./२०१२/शा२५१८३
दिनांक : २४/८/२०१२

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

विषय : कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध करण्याकरता महिला तक्रार निवारण समित्यांचे योग्य प्रकारे गठन करणेबाबत

संदर्भ : या संचालनालयाचे पत्र क्रमांक १६/आस्था/म.त.नि.स/२०१२/१००, दिनांक ७/८/२०१२

उपरोक्त विषयाबाबत शासनाने सूचित केल्याप्रमाणे आपल्या अधिपत्याखालील संस्थांमध्ये महिला तक्रार निवारण समित्यांचे योग्य प्रकारे गठन करण्याबाबत संदर्भांकित पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. तथापि अद्यापही अशाप्रकारे गठीत करण्यात आलेल्या समित्यांच्या प्रति या संचालनालयास प्राप्त झालेल्या नाहीत.

सदर प्रकरणी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने त्यांच्या पत्र क्रमांक इएसटी-२०११/प्र.क्र.३१८/आस्था-१, दिनांक २१/८/२०१२ अन्वये विभागाच्या दिनांक ९/८/२०१२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीमध्ये उपस्थित झालेल्या मुद्यांची अंमलबजावणी करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. (सदर शासनपत्र व महिला व बाल विकास विभागाचे दिनांक ११/६/२०१० व दिनांक ४/१०/२०१० चे परिपत्रक सोबत जोडले आहे).

आस्था
१०२
२७/८

विभागीय कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक ८२०१
दिनांक 27 AUG 2012

D:\manasi\SANKIRNA\Mahila Complaint Cell...

तरी, आपणांस कळविण्यात येते की, याबाबत शासनस्तरावर लवकरच पुन्हा बैठक आयोजित करण्यात येणार असून त्याकरिता आवश्यक असलेली विवरणपत्र १ व २ मधील माहे जुलै, २०१२ पर्यंतची एकत्रित माहिती तसेच आपल्या अधिपत्याखालील शासकीय/अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित संस्थांमध्ये योग्य प्रकारे महिला तक्रार निवारण समिती स्थापन झाल्याबाबतचे प्रमाणपत्र आठ दिवसांमध्ये या संचालनालयास सादर करावे.

याबाबत असेही नमूद करण्यांत येते की, विवरणपत्र १ व २ मधील माहिती प्रत्येक महिना अखेरीस शासनास सादर करणे आवश्यक आहे. तरी, ऑगस्ट, २०१२ अखेर पासून प्रत्येक महिन्याची माहिती त्यापुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत संकलित स्वरूपात या संचालनालयास सादर करण्यांत यावी.

( दयानंद मेश्राम )
सहसंचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : कार्यासन क्रमांक १२, मुख्य कार्यालय, मुंबई यांना तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

महाराष्ट्र शासन

<u>तात्काळ/कालमर्यादीत</u>
<u>फॅक्सने</u>

क्र:-इएसटी-२०११/प्र.क्र.३१८/आस्था-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक- २१ ऑगस्ट, २०१२

प्रति,
कक्ष अधिकारी, (विशि-१)(विशि-४)
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई
संचालक, कला संचालनालय, मुंबई.
संचालक, ग्रंथालय संचालनालय, मुंबई.

विषय:- कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध करण्याकरता महिला तक्रार निवारण समित्यांचे योग्य प्रकारे गठन करणेबाबत-

संदर्भ:- विभागाचे समक्रमांकाचे दिनांक २३/७/२०१२ रोजीचे पत्र

दि. ९/८/२०१२ रोजींच्या बैठकीकरीता विभागाच्या संदर्भाधीन पत्रान्वये आपल्या संचालनालयाच्या व संचालनालयांच्या नियंत्रणाखालील कार्यालयात महिला तक्रार निवारण समित्यांचे योग्य गठन झाल्याबाबतचे प्रमाणपत्र विभागास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

२. कला संचालनालय, मुंबई व ग्रंथालय संचालनालय, म.रा.मुंबई वगळता अन्य संचालनालये व विद्यापीठे/संस्था यांच्याकडील अपूर्ण माहिती विभागास सादर करण्यात आलेली आहे. तसेच वारंवार पत्राने कळवूनही विवरणपत्र १ व २ मधील माहितीही प्रत्येक महिन्यानुसार सादर करण्यात येत नाही. सदर बैठकीत आपल्या माहिती अभावी विभागाचे प्रमाणपत्र महिला व बाल विकास विभागास सादर करण्यात येऊ शकले नाहीत. ही बाब अतिशय गंभीर आहे.

३. दि. ९/८/२०१२ रोजी आयोजित केलेल्या आढावा बैठकीत ज्या विभागांची माहिती /प्रमाणपत्र अप्राप्त आहे त्यांनी तात्काळ त्यांची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना बैठकीमध्ये देण्यात आलेल्या आहेत. व लवकरच याबाबतची बैठक पुन्हा आयोजित करण्यात येणार आहे. तसेच दि.९/८/२०१२ रोजीच्या बैठकीत खालील मुद्यांची अंमलबजावणी करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

१) प्रत्येक विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये विशाखा जजमेंट मधील मार्गदर्शक सूचनानुसार महिला तक्रार निवारण समित्यांचे गठण करणे आवश्यक आहे.
२) अशा समित्यांमध्ये समितीची अध्यक्ष ही वरीष्ठ महिलाच असावी. व किमान एका अशासकीय सदस्याचा समावेश समितीत असावा. अशासकीय सदस्याचा समावेश नसलेली समिती अधिकृत समजण्यात येणार नाही व त्या समितीने केलेली चौकशी ग्राहय धरण्यात येणार नाही. त्यामुळे ज्या कार्यालयांच्या समितीमध्ये अशासकीय सदस्य नाही त्यांनी समितीमध्ये अशासकीय सदस्याचा समावेश करुन तात्काळ आदेश निर्गमित करावेत. (महिला व बाल विकास विभाग परिपत्रक दि.११/६/२०१० मध्ये अशासकीय सदस्यांची यादी समाविष्ट केलेली आहे. सदर परिपत्रक सोबत

...2/-

पत्र प्राप्त झाले
2 3 AUG 2012
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई १.

क्रमांक ३६
डॉ. ओसवाल
२३/८/१२

आ.क्र. २५२८४
दि. २४/८/२०१२

करुन तात्काळ आदेश निर्गमित करावेत. (महिला व बाल विकास विभाग परिपत्रक दि.११/६/२०१० मध्ये अशासकीय सदस्यांची यादी समाविष्ट केलेली आहे. सदर परिपत्रक सोबत जोडले आहे.)

३) प्रत्येक कार्यालयात महिलेच्या छळाची तक्रार प्राप्त होताच त्या तक्रारीवर, महिला व बाल विकास विभाग शासन परिपत्रक दि.४/१०/ २०१० मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार विहीत कालावधीत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

४) प्रत्येक कार्यालयाने महिला तक्रार निवारण समितीची प्रत माहिती फलकावर लावावी. जेणेकरुन तक्रारदार व्यक्तीना तक्रार कोणाकडे करावी याबाबत माहिती मिळेल.

५) महिला तक्रार अर्ज/प्रकरणे यांबाबतची माहिती विवरणपत्र-१ व विवरणपत्र-२ मध्ये प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपर्यंत नियमितपणे न चुकता संचालनालयांस व त्यांच्यामार्फत शासनास पाठविणे आवश्यक आहे.

४. बैठकीत उपरोक्त मुद्यांची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, कृपया आपण वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. व या प्रकरणी गांभीर्याने आवश्यक कार्यवाही करावी.

५. यासंदर्भात कळविण्यात येते की, विशाखा जजमेंटनुसार शासनाच्या प्रत्येक कार्यालयात महिला तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात यावी या निदेशाचे पालन शासनाच्या सर्व संस्था/मंडळे/कार्यालये यांनी केले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार समितीची रचना त्यामध्ये अशासकीय सदस्याचा समावेश इ. बाबी लक्षात घेऊन योग्य प्रकारे समिती गठीत करावी. सर्व संचालनालये/विद्यापीठे यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संस्थांमध्ये योग्य प्रकारे महिला तक्रार निवारण समिती स्थापन झाल्याबाबत प्रमाणपत्र शासनास तात्काळ सादर करावे. व माहे जुलै, २०१२ पर्यंतचे विवरणपत्र १ व विवरणपत्र २ मधील एकत्रित माहिती शासनास सादर करावी.

महिला व बाल विकास विभागास लवकरच विधीमंडळात साक्षीकरीता विभागाची माहिती सादर करायची असल्याने याप्रकरणी तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे. सबब या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन वेळेत माहिती सादर केली जाईल यांची कृपया दक्षता घ्यावी.

(शैला तारगे-पाटील )
सहसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
सर्व सह/उपसचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

यांनी कृपया त्यांच्या उपविभागाशी संबंधित संचालनालयांना, त्यांची एकत्रित माहिती शासनास लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याबाबत तात्काळ सूचना द्याव्यात व पाठपुरावा ही करावा.

अवर सचिव (मकक), महिला व बाल विकास विभाग,
नवीन प्रशासन भवन, तिसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२.

कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक सतावणुकी संदर्भातील तक्रारींची चौकशी करण्यासाठी समितीत अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
महिला व बालविकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांक-मकक २०१०/प्र.क्र.४६/मकक
नवीन प्रशासन भवन, ३रा मजला,
मंत्रालय,मुंबई-३२
दिनांक : २१ जून, २०१०.

वाचा: १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआर व्ही/१०९९/७३/मकअ, दिनांक ११ मे १९९९
२) शासन परिपत्रक क्र.संकर्ण-२००६/प्र.क्र.१०/मकअ, दिनांक १७ मे. २००६
३) शासन निर्णय क्र.मकमो-२००६/प्र.क्र.१५/मकक, दिनांक १९ सप्टेंबर २००६

**शासन परिपत्रक** :-

कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक सतावणुकीस प्रतिबंध करण्यासाठी १९९२ चा रिट विनंती अर्ज (सीआरएल) क्र.६६६-७० मधील सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयातील मार्गदर्शक तत्वे भारत सरकारकडून प्रसृत करण्यात आली असून राज्यस्तरावर राज्य महिला तक्रार निवारण समितीकडून सदर मार्गदर्शक तत्वांच्या आधारे लैंगिक छळवादाबाबत येणाऱ्या तक्रारींची चौकशी करून कारवाईची शिफारस संबंधित विभागांना करण्यात येते.

२. मा. सर्वोच्च न्यायालयाने डॉ. मेधा कोतवाल लेले विरुद्ध केंद्रशासन याप्रकरणी दिलेल्या आदेशात सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात व इतर संस्थेत महिला तक्रार निवारण समित्या गठीत करणे बंधनकारक केले आहे. त्यानुसार दिनांक १७ मे २००६ च्या परिपत्रकानुसार सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये महामंडळे यांना अशा समित्या गठीत करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

३. अशा समितीची अध्यक्षा ही महिलाच असावी व समितीत ५०% पेक्षा जास्त महिलांचा समावेश असावा व किमान एका अशासकीय सदस्याचा समावेश असावा अशी तरतूद मा. सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार आहे. परंतु बऱ्याच कार्यालयातील महिला तक्रार निवारण समितीमध्ये अशासकीय सदस्यांचा समावेश करण्यात येत नाही. अशा समित्या गठीत करताना लैंगिक छळवादाच्या तक्रारीबाबत काम करणाऱ्या अशासकीय सदस्यांची माहिती बऱ्याच कार्यालयांना नसते त्यामुळे अशा समितीमध्ये अशासकीय सदस्यांची नियुक्ती केली जात नाही.

४. सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालयातील महिला तक्रार निवारण समितीमध्ये अशासकीय सदस्यांचा समावेश करणे सुकर व्हावे म्हणून अशा प्रकारचे कार्य करणाऱ्या काही अशासकीय सदस्यांची जिल्हा निहाय यादी खाली देण्यात येत आहे.

## कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणा-या छळास प्रतिबंधक अशा अशासकीय संस्थांची यादी

| अ.क्र | जिल्हा | अशासकीय संस्था | पूर्ण पत्ता दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | मुंबई शहर | १) इंडिया सेंटर फॉर ह्यूमन राईटस एंड लॉ | मोतीलाल मेन्शन, १ ला मजला, डांबर गल्ली, मस्जिद बंदर, मुंबई -०९<br>दुरध्वनी क्र. ०२२-२३४३९६५१ |
| | | २) अक्षरा | गोखलेरोड, म्यु. स्कूल, २ री मजला, दादर (प), मुंबई-८<br>दु.क्र. ०२२२४३०९६०६ |
| २ | मुंबई उपनगर | १) टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स, देवनार, मुंबई | महिला व मुलांकरिता सहाय्य कक्ष, टाटा सामाजिक विज्ञान संस्था, देवनार, मुंबई-८८<br>दु.क्र. २५५२५७५७ |
| | | २) स्त्री मुक्ती संघटना | रमाबाई प्रसुतिगृहाच्या आवारात, जैन मंदिरा समोर, आर.सी. मार्ग, चेंबूर, मुंबई- ७१<br>दु.क्र. ६५१६६०२९ |
| ३ | ठाणे | १) परिवर्तन महिला संस्था | सुदाम बिल्डींग, नांदिवली रोड, डोंबिवली (प), जिल्हा ठाणे.<br>मो. [illegible] |
| | | २) भारतीय स्त्रीशक्ती संघटना | गणेश कृपा बिल्डींग, १ ला मजला, एस्.वी. फडकर रोड, एल.आय.सी. कार्यालयाचे वर, रामनगर, डोंबिवली (पूर्व), -४२१२०१, जि.ठाणे.<br>दु.क्र.०२५१-२८६०१५३<br>मो.९८९२११८३६८,९९६७२६५४६७ |
| ४ | रायगड | १) पुरंदर स्नेह सामाजिक कल्याण संस्था | श्रीमती जोशी रेखा सतीश,<br>खारघर नवी मुंबई, ता.पनवेल, जि. रायगड<br>rekhajoshi1902@gmail.com |
| | | २) पुरंदर स्नेह सामाजिक कल्याण संस्था | श्री माधव संजय पाडुरंग,<br>खारघर नवी मुंबई, ता.पनवेल, जि. रायगड<br>ऑफिस-२७७४३३६९<br>मो.नं.९८६९०००८२३ |
| ५ | रत्नागिरी | १) आकार संस्था कोंडये | सौ.अरूणा देवेंद्र पाटील,<br>मु. पो. कोंडये, ता. लांजा, जि. रत्नागिरी<br>दु.क्र.०२३५०-२३०९३७<br>मो. नं.९४२२५९१०९१ |
| | | २) महिला मंडळ वडनाका | श्रीमती सुमती घोडदेव जांभेकर,<br>महिला मंडळ, वडनाका, ता.चिपळूण, जि. रत्नागिरी<br>दु.क्र.०२३५५२५२८११, मो.क्र ९४२२५९५७०७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | सिंधुदुर्ग | महिला मंडळ कुडाळ | शिवाजी नगर, अल्पबचत हॉल, कुडाळ, जि.सिंधुदुर्ग.<br>दु.क्र.०२३६२-२२४२८३ |
| | | माऊली महिला मंडळ | मु.पो. शिरोडा, ता. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग<br>दु.क्र. ०२३६६-२२७२५० |
| ७ | पुणे | १) कुसुमबाई मोतीचंद महिला सेवाग्राम संचलित आधारगृह | २५/२०, कर्वे रोड, पुणे -४<br>दु.क्र. २५४४०४९० |
| | | २) फॅमिलि कॉउसलींग सेंटर | श्रीमती कुलकर्णी अपर्णा बालाजी,<br>मळवली रेल्वे स्टेशनजवळ, ता.मावळ, जिल्हा.पुणे.<br>ऑफिस ०२११४-२८२७३४<br>मो. नं ९२७२४९६३१० |
| ८ | सांगली | १) भगिनी निवेदिता प्रतिष्ठान सांगली | गणेश दुर्ग, राजवाडा परिसर, सांगली .<br>दु.क्र. ०२३३-२३७३२७३ |
| | | २) राजारामबापू ज्ञान प्रबोधिनी | श्रीमती शेख नूरजहाँ जावेद,<br>आदर्श बालक मंदिर शाळा, ठरण- इस्लामपूर, जि. सांगली.<br>मो.नं. ९९२१३३८७४७ |
| ९ | कोल्हापूर | १) श्री शिंदे आनंद विनकर | राशिवडे कला क्रिडा मंडळ, राधानगरी, जि.कोल्हापूर.<br>मो नं ९४२११०९४८४ |
| | | २) महाराष्ट्र उद्योग मित्रमंडळ | गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.<br>मो.नं. ९८५०२३५५६७ |
| १० | सातारा | १) त्रिशक्ती फाऊंडेशन, कराड | श्रीमती फाळके लिसा तुकाराम,<br>कराड, जि. सातारा.<br>निवास. ९२२५७१८१८८ मो नं.९४२३१४९३०५ |
| | | २) महालक्ष्मी महिला मंडळ | श्रीमती पवार स्वाती सितराम,<br>जिल्हा परिषद, सातारा.<br>निवास ९४२२०२९७११ मो नं-९७६५४०००७८ |
| ११ | नाशिक | लोक विकास सामाजिक संस्था | ५६/६७, जुनी न.न.पा. शाळा, फुले नगर, पेठ रोड, पंचवटी, नाशिक.<br>दु.क्र.०२५३-२५१८४११/२५१२३०१ |
| | | २) स्वधर्म समाजविकास मंडळ | श्री शेवाळे विष्णु भिवसन,<br>तिरुपती सोसायटी, गाळा नं.५, देवळा जि. नाशिक<br>ऑफीस -९४२११३८१७८ मो नं-९८६०७१३७३० |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | अहमदनगर | ग्रामीण विकास संशोधन केंद्र | श्रीमती खोसे पुष्पा वामन,<br>ग्रामीण विकास संशोधन केंद्र पारनेर<br>पंचायत समिती पारनेर जि.अहमदनगर<br>मो नं ९५५२९४७५८ |
| | | २) शिवपार्वती विकास संस्था | डॉ आंधळकर राजकुमार विश्वनाथ<br>मु.पो. राशिन ता. कर्जत जि. नगर<br>ऑफिस ०२४८९-२५०५२५<br>मो.नं. ९४२३१६०३४१<br>ई-मेल : spvorg@yahoo.co.in |
| १३ | जळगांव | १) श्री गडे सचिन अशोक | मेन रोड बावल पिपल फॉ .बँकेच्या मागे<br>जिल्हा जळगांव<br>मो.नं ८०८७३२६०६५ |
| | | २) ओम साई शैक्षणिक व सामाजिक संस्था | न्यु प्लॉट सानेगुरुजी मार्ग ,भगिनी मंडळ शाळे जवळ अमळनेर जि. जळगांव<br>दू.क्र. ०२५८७-२२५५६५ मो. नं ९४२२६४२६२२ |
| १४ | धुळे | १) महिला समुपदेशन केंद्र | श्रीमती कुवर चंद्रनबाई गिरीधर<br>श्री ज्ञानमंदिर ट्रस्ट शिरपूर जि. धुळे<br>ऑफीस-२५५४२८/२५५४६९<br>मो. [illegible] |
| | | २) धन्वंतरी चॅरीटेबल ट्रस्ट | श्रीमती सराईकर आशा काशिनाथ<br>रेल्वे स्टेशन रोड जि. धुळे<br>मो. [illegible] |
| | | ३) श्रीमती वानखेडे सुनीता प्रमोद | [illegible] संस्था जि.परिषद धुळे<br>ऑफीस [illegible] मो.नं ९४०३२३५२०८ |
| १५ | अमरावती | १) लिबरल फ्रेन्डस असोसिएशन अमरावती | [illegible] एम.एस.ई.बी. ऑफीसच्या बाजूला, पोस्ट साईनगर, बडनेरा रोड, अमरावती जि. अमरावती<br>दूरध्वनी क्र. ०७२१-२५१२४४१ |
| | | २) श्री. गाडेकर जयवंत सुखदेवराव | माहुली चोर ता. नांदगांव खंडेश्वर, जि. अमरावती<br>ऑफीस ०७२३१-२२२६२१<br>मो.नं. ९७६४४६३७६५ |
| १६ | वाशिम | १) विमल्स एज्युकेशन सोसायटी, बुलडाणा व्दारा संचालित दिशा मुलींचे निरिक्षणगृह वाशिम | बाहेती हॉस्पिटल मार्ग, अल्लाड प्लॉट, वाशिम<br>फोन ४४४५०५<br>मो.नं.(श्री वाघ) ९४२२८८४४२० |
| १७ | यवतमाळ | १) प्रेरणा समुपदेशक केंद्र तथा महिला मदत केंद्र, पंचायत समिती, नेरपरसोपंत, जि.यवतमाळ | १)श्री बनसोड सुखराज शंकरराव,<br>ऑफीस ०७२६८-२६८२४४<br>मो.नं. ९४३००७४०२५ |
| | | २) श्रध्दा महिला बहुउद्येशीय शिक्षण व कला प्रसारक मंडळ राळेगाव. | श्रीमती अनिता चापले , एल आय. सी. कॉलनी महादेव नगर, यवतमाळ<br>दु. क्र. ९४२१८५२१६७ |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | अकोला | १) श्री थगाटे जितेंद्र तुळशीराम | समता नगर, कैलास टेकडी, निमवाडीजवळ, अकोला<br>निवास. ९३७१७९७३२८ मो.न ९८२२७१४४०५ |
| | | २)श्री शिरसाट प्रमोद उत्तमराव | महिला समुपदेशन केंद्र, बाळापूर कोर्ट जवळ, पंचायत समिती, बाळापूर, जि. अकोला<br>मो.न ९७६५३३१२८५ |
| १९ | परभणी | १)श्रीमती आरोळे लता रमाकांत | प्रियदर्शनी महिला मंडळ, सेलू, जिल्हा परभणी (विद्यानगर) |
| | | २) पंडिता रमाबाई समाजसेवा मंडळ परभणी नारायणचाळ ता. जि. परभणी | नारायण चाळ, परभणी<br>मो. ९८२३२८२४१९,९३७१२५६४७८ |
| २० | उस्मानाबाद | १) श्री खरात दिपक सिद्राम | तेरणा पब्लीक चॅरीटेबल ट्रस्ट, तुळजापूर रोड, उस्मानाबाद<br>ऑफीस ०२४७२-२५१६४६<br>निवास-९४२१३५७३३८ मो.नं. ९२२६३६८४८७ |
| | | २) श्री साई सेवाभावी संस्था संचलित मधुमती बालसदन, ढोकी, ता. व जि. उस्मानाबाद | श्री साई सेवाभावी संस्था संचलीत मधुमती बालसदन, ढोकी, ता. व जि. उस्मानाबाद. |
| २१ | बुलढाणा | १) श्री सोनटक्के श्रीपाल प्रद्युम्न | दिशा मल्टीपर्पज ऑर्गनायझेशन ,केंद्र माळवार, देऊळगाव जि. बुलढाणा.<br>मो.नं. ८८०५३८३८८० / ९४२२५९१३४१ |
| २२ | हिंगोली | १) श्री सातपुते विठ्ठल जगनाथ | पूजा महिला विकास सेवाभावी संस्था, महिला समुपदेश केंद्र, औंढा, ता. जि. हिंगोली<br>मो.नं. ९२७२६८३३२१ |
| | | २) ज्ञानसागर महिला विकास मंडळ, हिंगोली | शिवलिंग नगर,अकोला बायपास रोड,हिंगोली<br>मो. ९८५०१९९६४५ |
| २३ | बीड | १) मानव विकास मंडळ, जनसाधन ता. अंबाजोगाई जि. बीड | प्रशांत नगर, उधळिव. कॉलनी, बस स्टँडच्या पाठीमागे, अंबाजोगाई, जि. बीड<br>मो. ९४२२७४३५०६ |
| | | २) सावित्री फुले महिला मंडळ, [illegible] जि. बीड | एन.के.के. प्लाझा, चंपावती शाळेशेजारी, जुनानगर नाका, बीड-४३११२२<br>मो. ९३२५०५६८९३ |
| २४ | नांदेड | १) लोकसेवा जन विकास मंडळ | सकनुर, ता. मुखेड, जि. नांदेड<br>मो.९४२३५८००५० |
| | | २) गंधर्व गायन वादन संगीत विद्यालय | साईनगर, देगलूर, जि. नांदेड<br>फोन:०२४६३-२५५१२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | नागपूर | १) श्रीमती केळकर वैशाली श्रीराम | तेजस्विनी बहु. सेवाभावी संस्था, हिंगणा, जिल्हा नागपूर<br>मो.नं ९४०३१४५८१८<br>मो. नं. ९५९६६०७७९४ |
| | | २) श्री. रेवतकर अनिल नामदेवराव | कर्मवीर बहुउद्देशिय शिक्षण संस्था, नारखेड, जिल्हा नागपूर-४१२५२४<br>मो.नं.-९२२६७२९९९८ |
| २६ | औरंगाबाद | १)श्री सोनवणे चंद्रकांत पुरुषोत्तम | साहित्य सरकार प्रबोधिनी, औरंगाबाद<br>मो.नं.९८६०७५६४०१ |
| | | २) श्रीमती मते शिवकन्या हरीश्चंद्र | महिला तक्रार निवारण केंद्र, पंचायत समिती कार्यालय, जि.औरंगाबाद<br>मो.नं. ९४२१४२०६७१ |
| २७ | लातूर | १) श्रीमती सागर सोमवती महादेव | श्री गणेश शिक्षण प्रसारक मंडळ, जिल्हा परिषद, लातूर<br>निवास ९७६७५६७३८३<br>मो.नं.९२४९४११९४६ |
| | | २) श्री गंगापुरे माधव बाबुराव | महिला काउन्सलिंग सेंटर, शिवजागृती बहुउद्देशिय विकास मंडळ, शिवानंद नगर, नळेगाव, ता. चाकूर, जि. लातूर<br>ऑफिस-९४२३३५०९५९,<br>निवास-२१७५२६३६५१ |
| २८ | जालना | १) श्री जाधव राहुपाल तुकाराम | महिला समुपदेशन केंद्र, पंचायत समिती ता. अंबड, जि. जालना<br>निवास-९४२१३२०९३७ मो.नं. ९९७३७७२४२७ |
| | | २) श्री नवारे प्रभाकर जगन्नाथ | महिला समुपदेशन केंद्र [illegible], पंचायत समिती, बदनापूर, तालुका बदनापूर, जि. जालना<br>निवास १०२८९६५८६८<br>मो.नं. ९४२३४४९०३५ |
| २९ | गोंदिया | १) श्री गणवीर पुष्पकुमार धीरसिंग | कायदेविषयक सल्लागार तथा समुपदेशक, आधार महिला समुपदेशन केंद्र, गोंदिया.<br>निवास ९५७९०९७९८६<br>मो.नं. ९०२८६९४६६३ |
| ३० | भंडारा | १) ग्रामीण युवा प्रगतिक मंडळ, | जुना तारघर समोर, त्रिमुर्ती चौक, भंडारा<br>दुरध्वनी क्र.०७१८४-२५६९८४ |
| | | २) युवा महिला समुपदेशन केंद्र | पोलिस मुख्यालय, भंडारा<br>मो.नं.९४२२८३१०८३ |
| ३१ | चंद्रपूर | १) हर्षल ग्रामीण विकास बहु. संस्था | डॉ. सचिन पिंपरे, काटघाल भवन, मूल रोड, चंद्रपूर<br>मो.नं.९४२२१३५३२९ |
| | | २) दिलासा ग्राम समाज सेवा केंद्र | बल्लारपूर, जि.चंद्रपूर<br>दुरध्वनी क्र.०७१७२-२४५३२२ |

याव्यतिरिक्त उक्त विषयास अनुसरुन सामाजिक कार्याला वाहून घेतलेले, महिला वकील, डॉक्टर, प्रोफेसर, लेक्चरर, तसेच सेवानिवृत्त व्यक्ती, अशाप्रकारचे काम स्वयंस्फूर्तपणे करणार असतील तर त्यांचा अशासकीय सदस्य म्हणून समावेश करण्यात यावा.

५. सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालये, महामंडळे, मंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, रुग्णालये, विद्यालये इत्यादी ठिकाणी महिला तक्रार निवारण समितीचे गठण करताना त्या समितीमध्ये वरील पैकी एक किंवा दोन अशासकीय सदस्यांचा समावेश करण्यात यावा. तसेच ज्या जिल्ह्यांमध्ये अशा त-हेचे काम करणा-या अशासकीय संस्था कार्यरत नसतील अशा जिल्ह्यातील कार्यालयांनी शेजारच्या जिल्ह्यातील अशासकीय सदस्यांचा समावेश समितीमध्ये करावा.

६. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी वरील आदेश त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणावेत आणि या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल, याबाबत दक्षता घ्यावी.

७. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक ~~२०१००६१६१७०५४०७००१~~ २०१००८१७५९५२६८३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(सो. शि. मत्रे)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति,
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव यांचे उप सचिव
अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव,मंत्रालयीन सर्व विभाग
अध्यक्ष राज्य महिला तक्रार निवारण समिती, मुंबई
राज्य महिला तक्रार निवारण समितीचे सर्व विद्यमान सदस्य
राज्य महिला तक्रार निवारण समितीचे नव्याने समाविष्ट पदाधिकारी
सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना)
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा) मुंबई
*प्रबंधक उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई
*प्रबंधक,उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद /नागपूर
*प्रबंधक लोक आयुक्त आणि उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
सचिव ,महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई
सर्व महानगर पालीकांचे आयुक्त
सर्व नगरपालिका/सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी

कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळवणूकीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी करताना अवलंबावयाची कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन परिपत्रक, क्र. मकचौ-२००९/प्र.क्र.१९/मकक
नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक :- ४ ऑक्टोबर, २०१०

वाचा :- १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०९९/७३/मकअ, दि.१९.५.१९९९
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.मकचौ-२००४/१६/प्र.क्र.१/मकअ, दि.३ ऑगस्ट, २००४
३) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीडीआर-१००८/प्र.क्र.४५/८/११, दि.१.४.२०१०
४) शासन परिपत्रक, क्र.मकक-२००७/प्र.क्र.७/मकक, दि.२६.१२.२००७

प्रस्तावना :- कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने विशाखा जजमेंटमधील दिलेल्या निर्णयातील मार्गदर्शक तत्वानुसार कार्यालयाच्या ठिकाणी कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यास महिलेचा लैंगिक छळ करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम-२२-ए नुसार लैंगिक छळवणूक हे गैरवर्तन मानण्यात आले आहे. कार्यालयाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक सतावणूक झाल्याच्या संदर्भात तक्रार प्राप्त झाल्यास वर्तणूक नियमाचा भंग झाल्याच्या कारणास्तव अशा प्रकारचे गैरवर्तन करणाऱ्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९ मधील तरतूदीनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद आहे. तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.३.८.२००४ नुसार राज्य महिला तक्रार निवारण समितीने एखाद्या प्रकरणी चौकशी करुन दिलेला चौकशी अहवाल हा अंतिम चौकशी अहवाल मानण्यात आला आहे. सदर चौकशी अहवाल विचारात घेऊन संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने त्याप्रकरणी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतुदीनुसार शिक्षेची कार्यवाही करणे आवश्यक व बंधनकारक केले आहे. तथापि, अशा लैंगिक छळवणूकीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी करताना कोणती कार्यपध्दती अवलंबावी हा प्रश्न विचाराधीन होता.

२. सामान्य प्रशासन विभागाने शासन अधिसूचना क्र. सीडीआर-१००८/प्र.क्र.४५/०८/११, दिनांक १.४.२०१० अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ च्या नियम २२ -अ च्या अंतर्गत कामाच्या ठिकाणी लैंगिक सतावणूकीस अनुलक्षून प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी प्रत्येक विभागात किंवा कार्यालयात गठीत करण्यात आलेली महिला तक्रार निवारण समिती ही शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने नियुक्त केलेले चौकशी प्राधिकरण असल्याचे मानण्यात आले असून, अशा तक्रारींची चौकशी करण्यासाठी तक्रार निवारण समितीकरिता स्वतंत्र कार्यपध्दती विहित केली नसेल तर, महिला तक्रार निवारण समिती महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ मध्ये घालून दिलेल्या

कार्यपध्दतीनुसार जेथवर व्यवहार्य असेल तेथवर स्वत: चौकशी करेल अशी तरतुद केलेली आहे. त्यानुसार, लैंगिक सतावणूकीस अनुलक्षून प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ८ मधील कार्यपध्दती अवलंबून चौकशी करण्यासाठी विभागात / कार्यालयात गठीत करण्यात आलेली महिला तक्रार निवारण समिती ही शिस्तभंगविषयक प्राधिका-याने नियुक्ती केलेले चौकशी प्राधिकरण म्हणून काम करेल / असेल.

३. तसेच अशा प्रकरणातील चौकशी ही तात्काळ होऊन संबंधित महिलेला सत्वर न्याय मिळणे अत्यावश्यक असल्याने शासन परिपत्रक क्रमांक मकक/२००७/प्र.क्र.७/ मकक, दिनांक २६ डिसेंबर २००७ अन्वये अशा तक्रारींची चौकशी करण्यासाठी जी कालमर्यादा ठरवून देण्यात आली आहे. त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याने तसा प्रस्ताव विचाराधिन होता.

❖ उक्त परिस्थितीत लैंगिक छळवणूकीबाबतची तक्रार प्राप्त झाल्यानंतर करावयाच्या कार्यवाहीबाबत.

(अ) शिस्तभंग विषयक प्राधिका-याने करावयाच्या कार्यवाहीसाठी यापुढे खालील प्रमाणे कार्यपध्दती / कालमर्यादा ठरवून देण्यात येत आहे.

(१) लैंगिक छळवादाची तक्रार प्राप्त झाल्यास शिस्तभंगविषयक प्राधिका-याने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ८ मध्ये घालून दिलेल्या तरतुदींनुसार तक्रारी संदर्भात दोषारोपपत्र तयार करून ते संबंधित अधिकारी / कर्मचा-यावर बजावावे व त्या तक्रारीची चौकशी करण्याकरिता संबंधित कार्यालयातील महिला तक्रार निवारण समितीस चौकशी प्राधिकरण म्हणून नेमावे.

(२) लैंगिक छळवणूकीची तक्रार प्राप्त झाल्यानंतर शिस्तभंगविषयक प्राधिका-याने तक्रारदार महिलेला तसेच ज्याच्याविरूध्द तक्रार आहे अशा अधिकारी / कर्मचा-यास १५ दिवसांच्या आत सुनावणी देऊन त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे.

(३) तद्नंतर शिस्तभंगविषयक प्राधिका-याने ज्या अधिकारी / कर्मचा-याविरूध्द तक्रार आहे, त्या अधिकारी / कर्मचा-याविरूध्द पुढील ३० दिवसांत दोषारोपपत्र तयार करून ते त्यांच्यावर बजावावे व त्याबाबतीत संबंधित कर्मचा-याला त्याचे निवेदन त्यापुढील १५ दिवसांच्या आत सादर करण्याचे निदेश द्यावेत.

(४) या मुदतीत संबंधित अधिकारी / कर्मचा-याचे निवेदन प्राप्त न झाल्यास, त्यांचे प्रकरण महिला तक्रार निवारण समितीकडे पाठविले आहे असे त्यांना कळवून त्यांचे जे काही म्हणणे असेल ते आता महिला तक्रार निवारण समितीपुढे सादर करण्यास सूचित करावे; आणि तक्रारदाराचा तक्रार अर्ज, संबंधितावर बजावलेले दोषारोप पत्र व इतर संबंधित कागदपत्रे महिला तक्रार निवारण समितीकडे चौकशीसाठी पाठवावीत ही कार्यवाही त्यापुढील १० दिवसांत करण्यात यावी.

(५) अशा प्रकरणात सादरकर्ता अधिकारी म्हणून महिला अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती करण्यासंदर्भात कटाक्ष असावा.

(ब) महिला तक्रार निवारण समितीने पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

लैंगिक छळाबाबतची प्राप्त झालेली तक्रार, त्या अनुषंगाने शिस्तभंगविषयक प्राधिका-याने बजावलेले दोषारोपपत्र, त्यावरील संबधित अधिकारी /कर्मचारी यांचे निवेदन व इतर संबंधित कागदपत्राच्या आधारे महिला तक्रार निवारण समितीने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ८ मध्ये घालून दिलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करून चौकशी करावी. अशी चौकशी दोन महिन्यात पुर्ण करून सदर चौकशी अहवाल शिस्तभंगविषयक प्राधिका-यास सादर करावा व त्या अहवालाची एक प्रत राज्य महिला तक्रार निवारण समितीस पाठवावी.

सदर चौकशी अहवाल अंतिम चौकशी अहवाल असेल. सदर अहवालावरील राज्य महिला तक्रार निवारण समितीच्या शिफारशीनुसार शिस्तभंगविषयक प्राधिका-याने म. ना. से. (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील तरतुदी नुसार पुढील कार्यवाही करावी.

(क) तक्रार अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही झाली नाही तर करावयाच्या कार्यवाहीबाबत.

(१) महिलेच्या तक्रार अर्जावर शिस्तभंगविषयक प्राधिका-याने एक महिन्यात कार्यवाही केली नाही तर संबंधित महिलेने त्यांच्या वरिष्ठ प्राधिका-याकडे तक्रारीबाबत दाद मागावी.

(२) अशा प्रकारे महिलेची तक्रार प्राप्त झाल्यानंतर संबंधित वरिष्ठ प्राधिका-याने विहित केलेल्या कालमर्यादेत त्यांच्याकडील महिला तक्रार निवारण समितीकडून चौकशीची कार्यवाही करावी. तसेच जे शिस्तभंगविषयक अधिकारी त्यांनी घालून दिलेल्या कालमर्यादेत अशा तक्रार अर्जावर कार्यवाही करत नाहीत त्यांच्या विरूध्द कारवाई करण्याच्या दृष्टीने संबंधित विभाग प्रमुख / प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी त्या शिस्तभंगविषयक प्राधिका-याचा खुलासा घेवून त्यांच्या विरूध्द म.ना. से. (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार विभागीय चौकशीची कारवाई करावी.

(३) या प्रकरणी वरिष्ठ प्राधिका-यानेही न्याय दिला नाही तर संबंधित महिला, राज्य महिला तक्रार निवारण समितीकडे दाद मागु शकते.

सदर शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१०१००६१९५७४५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वन्दना कृष्णा)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. महिलांचे हक्क व कल्याण समिती, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. विरोधी पक्ष नेता कार्यालय, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

७. मुख्य सचिवांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
८. शासनाचे सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (५ प्रती)
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई.
११. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई.
१२. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद / नागपूर.
१३. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद / नागपूर.
१४. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१५. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१७. विभागीय आयुक्त, कोकण / नाशिक/ पुणे/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर.
१८. सर्व जिल्हाधिकारी
१९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२०. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.
२१. सर्व नगरपालिकांचे, नगरपरिषदांचे मुख्य अधिकारी.
२२. सर्व शासकीय महामंडळे, कंपन्या, स्थानिक स्वराज्य संस्था.
२३. शासन अनुदानित मंडळे, संस्था.
२४. सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना शाखा)
२५. सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिनस्ताखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
२६. यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, राजभवन आवार, बाणेर रस्ता, पुणे.
२७. महिला व बाल विकास विभागातील सर्व कार्यासने.
२८. निवड नस्ती (मकक)
* पत्राने.

१६

## विवरणपत्र-१

शासकीय कार्यालये / निमशासकीय कार्यालये /शासकीय महामंडळे / कंपन्या / स्थानिक स्वराज्य संस्था /शासन अनुदानित मंडळे व संस्था इ.ठिकाणच्या महिला तक्रार निवारण समित्यांकडे प्राप्त आलेल्या तक्रारी.

कार्यालयाचे नाव :- ----------------------------------------

| अ.क्र. | प्राप्त झालेल्या तक्रारींची संख्या | चौकशी पूर्ण करण्यात आलेली प्रकरणे | चौकशीची कार्यवाही सुरू असल्यास चौकशीची सद्यःस्थिती | थकीत प्रकरणांचे वर्गीकरण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ० ते ६ महिन्यातील प्रकरणे | ७ ते १२ महिन्यातील प्रकरणे | १ वर्षावरील प्रकरणे | एकूण थकीत प्रकरणे (५+६+७) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

कार्यालय प्रमुखाचे नांव :----------------

सही :---------------

## विवरणपत्र-२

शासकीय कार्यालये / निमशासकीय कार्यालये /शासकीय महामंडळे / कंपन्या / स्थानिक स्वराज्य संस्था /शासन अनुदानीत मंडळे व संस्था इ.ठिकाणच्या महिला तक्रार निवारण समित्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारी.

कार्यालयाचे नाव :- ------------------------------------

## महिला तक्रार निवारण समिती

अध्यक्षाचे नाव :-
सदस्याचे नाव :-
सदस्याचे नाव :-
सदस्याचे नाव :-
सदस्याचे नाव :-
सदस्याचे नाव :-
सदस्याचे नाव :-
NGO सदस्याचे नाव :-
सदस्य सचिवाचे नाव :-

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव (मंत्रालयीन विभाग व क्षेत्रीय कार्यालयाचे नाव) | महिला तक्रार निवारण समितीकडे प्राप्त झालेल्या तक्रारींची संख्या | निकालात काढलेल्या तक्रारींची संख्या | प्रलंबित असलेल्या तक्रारींची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

-------